**पाहिजेत**

दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३३३ ■ शनिवार, दि. ५ एप्रिल २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -333 ■ Saturday, 5 April 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-


## समाजवादी पक्षाचे खासदार सुमन लाल यांनी महाराणा राणा सांगा यांचा अवमानकेल्याप्रकरणी महाराष्ट्र करणी सेनेतर्फे जाहीर निषेध




**समाजवादी पक्षाचे खासदार सुमन लाल यांनी संसदेत महाराणा राणा सांगा यांच्याबाबत केलेल्या अवमानकारक विधानावरून देशभरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर शुक्रवारी (दि. ४ एप्रिल) शहरातील कॅनॉट प्लेस परिसरात सकल राजपूत समाज, करणी सेना व विविध हिंदू संघटनांच्या कार्यकर्त्यांनी जोरदार निषेध आंदोलन केले. महाराष्ट्र करणी सेनेच्या कार्यकर्त्यांनी सुमन लाल यांच्या पुतळ्याला चपलांचा हार घालून, जोडे मारत संताप व्यक्त केला. त्यानंतर पुतळा पायदळी तुडवले. याचे नेतृत्व करणी सेनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष देवीचंदसिंह वारवाल यांनी केले. निदर्शनानंतर शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. या प्रसंगी भाग्यश्री राजपूत, डॉ. गीताताई शेवगण, हर्षा ठाकूर, भारतीबाई राजपूत, जगतसिंह राजपूत, अशोक गहिलोत, नंदूशेठ शिलवंत, बादलसिंह राजपूत, करणसिंह पवार (जालना), दत्ता पवार, बादलसिंह ताटू आदींची उपस्थिती होती.**

## वेरूळ घाटात डोंगर पेटले आग; परिसरात खळबळ, मोठा अनर्थ टळला



**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील वेरूळ घाटातील डोंगरावर शुक्रवारी दुपारी अचानक भीषण आग लागल्याने एकच खळबळ उडाली. जगप्रसिद्ध वेरूळ लेणीच्या माथ्यावर असलेल्या वन विभागाच्या जंगलात लागलेल्या या आगीत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झाले होते.

वेरूळ लेणीच्या पायथ्याशी असलेल्या मानवी वस्तीतही या आगीमुळे धास्तीचे वातावरण होते. दरम्यान,खुलताबाद परिसरात अशा आगीच्या घटना वारंवार घडत असून,ही आग नैसर्गिक की लावलेली, यावर अजून ही वनविभागाला ठोस उत्तर देता आलेले नाही.

वन विभागाच्या खुलताबाद कार्यालयाच्या अखत्यारीत साडे बारा हजार हेक्टर वन जमिनीची जबाबदारी असून ही, मात्र या जंगलाकडे वन विभागाचे असलेले दुर्लक्ष सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. विशेषत सुलीभंजन परिसरातील २६५ हेक्टर वन जमिनीवर देखील अशीच स्थिती आहे.दरवर्षी वृक्षलागवडीचे कार्यक्रम राबवले जात असले तरी त्याच्या संवर्धनाचा अभाव स्पष्टपणे दिसून येतो.अशा आगीमुळे केवळ वृक्षसंपदा नाही, तर जंगलातील वन्यजीवही धोक्यात आले आहे वेरूळ,म्हैसमाळ, सुलीभंजन परिसरात बिबट्या,हरीण, रानडुकर, सायाळ अशा अनेक वन्य प्राण्यांचा वावर आहे.पाण वठ्यांमध्ये पाणी नसल्यामुळे हे प्राणी पाण्याच्या शोधात वस्तीकडे येत असून, नागरिकांच्या भीतीपोटी त्यांच्यावर हल्ले होण्याच्या घटना घडत आहेत.या घटनेबाबतची माहिती पत्रकार हुसेन पटेल यांनी तत्काळ वन विभागाचे वन अधिकारी कृष्णा शिंदे यांना दिली. माहिती मिळताच शिंदे यांनी तातडीने वन मजूरांना घटनास्थळी पाठवले.त्यांनी प्रसंगावधान राखत आग आटोक्यात आणली.जर वेळेवर ही कारवाई झाली नसती, तर आग अधिक पसरून मोठा अनर्थ घडला असता, अशी प्रतिक्रिया स्थानिकांनी दिली..खुलताबाद परिसरातील वन विभागाच्या जंगलाला नेहमीच आग लागते.ही आग लावली जाते की अचानक लागते.यावर अनेक वेळा वन विभागाकडून चौकशीचा फार्स लावला जातो. आद्यापर्यंत कोणतेही ठोस उत्तर सापडले नाही. आगी संदर्भातील हा गहन प्रश्न असून,हे कायमस्वरूपी न उलगडणारे कोडे आहे. त्यात आग लागली नाही तर दरवर्षी वृक्षलागवडीसाठी लागणारी बिले कशी निघतील, असा प्रश्न ही काही पर्यावरणप्रेमींनी उपस्थित केला आहे.

## दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील प्रकरणाच्या चौकशी समिती गठित, मुख्यमंत्र्यांकडून गंभीर दखल

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली आहे. या घटनेची चौकशी करण्यासाठी पुण्याच्या धर्मादाय सहआयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठित करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत. त्याचप्रमाणे उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार तयार करण्यात आलेल्या धर्मादाय रुग्ण योजनेची धर्मादाय रुग्णालयांकडून अंमलबजावणी होत नसल्यास, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील कथित प्रकरणाची पुण्याच्या धर्मादाय सहआयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीकडून चौकशी करण्यात येईल. या समितीत उपसचिव, सह कक्षप्रमुख तथा कक्ष अधिकारी, धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष – मुख्यमंत्री सचिवालय यांचे प्रतिनिधी, मुंबईतील सर जे. जे. रुग्णालय समूहाचे अधीक्षक, तसेच विधि व न्याय विभागाचे उपसचिव/अवर सचिव हे या चौकशी समितीचे सदस्य सचिव असतील. याच प्रमाणे उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार धर्मादाय रुग्ण योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अंमलबजावणी बाबतही प्रधान सचिव विधी व न्याय विभाग तसेच धर्मादाय आयुक्त यांनी संनियत्रण व नियमन करावे याबाबतही मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले आहेत. या निर्देशात म्हटले आहे की, धर्मादाय रूग्णालयातील आरक्षित खाटा निर्धन व दुर्बल घटकातील रूग्णांसाठी उपलब्ध करुन देण्यासाठी सर्व धर्मादाय रुग्णालयांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे ‘धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची’ मान्यता घ्यावी. याबाबत धर्मादाय रुग्णालयांना तत्काळ निर्देश देण्यात यावेत.

विधी व न्याय विभागामार्फत गठीत करण्यात आलेल्या तपासणी पथकामार्फत तपासणी अहवाल व समितीच्या शिफारशी सादर केल्या आहेत. त्या शिफारशींवर तत्काळ कार्यवाही करावी. शासनामार्फत धर्मादाय रुग्णालयांमध्ये १८६ धर्मादाय आरोग्य सेवकांच्या सेवा घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. या पदांवरील भरती तत्काळ करण्यात यावी. निर्धन रुग्णनिधी (IPF) खात्याबाबतची अद्ययावत माहिती धर्मादाय रुग्णालयांकडून घेवून ती धर्मादाय आयुक्त यांच्या संकेतस्थळावर अद्ययावत करावी. योजनेची अंमलबजावणी न करणाऱ्या रुणालयांवर उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कठोर कारवाई करावी.

## छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील सरपंचपदाचे आरक्षण ११ एप्रिल रोजी जाहीर होणार

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

ग्रामविकास विभाग महाराष्ट्र राज्य आणि राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील सरपंच पदाच्या आरक्षणाची तारीख ११ एप्रिल २०२५ निश्चित करण्यात आली आहे.मौलाना आझाद संशोधन केंद्र, एन-१०, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे ११ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० वा. होणार आहे.

एप्रिल २०२५ ते मार्च २०३० या पाच वर्षांसाठी एकूण ११५ ग्रामपंचायतीसाठी होणार आहे. सरपंच आणि उपसरपंच निवडणूक नियम १९६४ च्या नियम (३) (४) नुसार हे आरक्षण काढण्यात येणार आहे.तालुक्यातील सर्व नागरिकांनी या जाहीर प्रकटनाद्वारे सरपंच पदाचे आरक्षण काढण्यासाठी वरील ठिकाणी, तारखेला आणि ठरलेल्या वेळेत सभागृहात उपस्थित राहावे. असे आवाहन तहसीलदार छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

## महात्मा बसवेश्वर सामाजिक समता शिवा पुरस्कारासाठी अर्ज मागविले

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

वीरशैव लिंगायत समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी कलात्मक, साहित्यिक आणि समाजप्रबोधनाच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना हा पुरस्कार दिला जातो. शासनाच्या निर्णयानुसार, वैशाख शुद्ध अक्षय तृतीया या दिवशी एक व्यक्ती आणि एका संस्थेला हा पुरस्कार देण्यात येतो.इच्छुक व्यक्तींनी विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह १० एप्रिल पर्यंत इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, खोकडपुरा येथे सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहायक संचालक अनंत कदम यांनी केले आहे.

## नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीतून गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवा – मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, भारतीय न्याय संहिता आणि भारतीय पुरावा कायदा हे तीन नवीन फौजदारी कायदे लागू झालेले आहेत. या कायद्यांच्या अंमलबजावणीतून गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्देश देत न्याय वैद्यक (फॉरेन्सिक) प्रयोगशाळांचे जाळे सक्षम करण्याच्या सूचना दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या कायद्यांचे पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात येणारे सर्व प्रशिक्षण पूर्ण करावे. तसेच याबाबत नवीन ‘रिफ्रेश कोर्सेस’ ही सुरू करावे. नवीन कायद्यांमध्ये गुन्हे सिद्ध करण्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण वाढणार असून त्यामुळे राज्याच्या गुन्हे सिद्धता दर निश्चितच वाढणार आहे.

गुन्हे सिद्धतेकामी बऱ्याचदा दवाखाने, वैद्यकीय महाविद्यालय येथून न्याय वैद्यक पुरावे गोळा करण्यात येतात. त्यामुळे अशा ठिकाणी न्यायवैद्यक प्रयोगशाळांची सुविधा निर्माण करण्यात यावी. सीसीटीएनएस २.० (क्राइम अँड क्रिमिनल ट्रेकिंग नेटवर्क सिस्टिम) मध्ये ‘बँड विथ’ ची क्षमता वाढविण्यात यावी. त्यामुळे देशपातळीवर सबंध असलेल्या गुन्ह्यांमध्ये गुन्हे सिद्धता वाढेल.

राज्यात सात वर्षांपेक्षा जास्त शिक्षा असलेल्या गुन्ह्यांमध्ये न्यायवैद्यक पुरावे तपासणे सक्तीचे करण्यात आले आहे. अशा प्रकरणांमध्ये न्यायवैद्यक पुराव्यांचा उपयोग करण्यामध्ये राज्याचे प्रमाण ६५ टक्के आहे. तसेच सात वर्षांहून कमी शिक्षा असलेल्या प्रकारांमध्ये न्यायवैद्यक पुरावांचा उपयोग करण्याचे प्रमाणही वाढवण्यात यावे. गुन्हे सिद्धतेमध्ये न्यायवैद्यक पुराव्यांचा प्रभावी उपयोग करण्यासाठी तपासणी अधिकाऱ्यांना टॅब देण्यात यावेत. टॅब खरेदी करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

न्यायालयीन प्रक्रियेमध्ये गतिमानता आणण्यासाठी या कायद्यांच्या अनुषंगाने ई समन्स, ई-साक्ष उपक्रम न्यायालयाच्या परवानगीने राबविण्यात यावे. तसेच कारागृहांमधील कैद्यांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून कुटुंबीयांशी संवादाची अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून द्यावी. जलद न्याय निवाड्यांसाठी न्यायालयाच्या परवानगीने ई – कोर्ट सुरू करण्याबाबत पडताळणी करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. बैठकीस गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बाल सिंग चहल, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, विधी व न्याय विभागाच्या प्रधान सचिव सुवर्णा केवले. मुख्यमंत्री यांचे सचिव श्रीकर परदेशी, कारागृह व सुधारण विभागाचे अपर पोलीस महांचालक सुहास वारके आदी उपस्थित होते.

## संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्यसभेचे १५९ तास चालले कामकाज

### अनेक महत्वाच्या विधेयकांना मिळाली दोन्ही सभागृहांची मंजूरी

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन शुक्रवारी संपले. राज्यसभा आणि लोकसभा अशा दोन्ही सभागृहांचे कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आले. ३१ जानेवारी २०२५ रोजी या अधिवेशनाला सुरवात झाली होती. या अधिवेशनामध्ये सरकारने देशाचा सर्वसाधारण अर्थसंकल्प मांडला, वक्फ दुरुस्ती विधेयक, त्रिभुवन सहकारी विद्यापीठ विधेयक, स्थलांतर आणि विदेश विधेयक यांना दोन्ही सभागृहांची मंजुरी मिळाली. यानंतर संसदेचे पावसाळी अधिवेशन होईल.

राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी सभागृहाच्या २६७ व्या सत्राच्या समारोपप्रसंगी सर्व सदस्यांचे सक्रिय योगदान दिल्याबद्दल आभार मानले. त्यांनी सांगितले की, या अधिवेशनात राज्यसभेचे एकूण १५९ तास कामकाज झाले. सभागृहाची उत्पादकता ११९ टक्के होती. अधिवेशनामध्ये, राज्यसभेचे सर्वात जास्त वेळ कामकाज ३ एप्रिल रोजी झाले. यादिवशी सकाळी ११ वाजता कामकाजाला सुरुवात झाली, सलग १७ तासानंतर ४ एप्रिल रोजी पहाटे ४:०२ वाजता कामकाज संपले.

राज्यसभेच्या इतिहासातील सर्वात जास्त वेळ कामकाज झालेला दिवस म्हणून ३ एप्रिल नोंदवला गेला. याशिवाय या अधिवेशनात ४९ खाजगी विधेयके सादर करण्यात आली, जो एक नवीन विक्रम आहे, असे राज्यसभा सभापती धनखड म्हणाले. अधिवेशनात लोकसभेच्या झाल्या २६ बैठका लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला सभागृहात म्हणाले की, या अधिवेशनात लोकसभेच्या एकूण २६ बैठका झाल्या आणि त्यांची उत्पादकता ११८ टक्के होती. या काळात १० नवीन सरकारी विधेयक मांडण्यात आली आणि १६ विधेयक मंजूर करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने वक्फ दुरुस्ती विधेयक, २०२५ आणि मुस्लिम वक्फ (रद्द) विधेयक, २०२४ यांचा समावेश होता. दरम्यान, संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन दोन टप्प्यात पार पडले. पहिला टप्पा ३१ जानेवारी ते १३ फेब्रुवारी दरम्यान चालला. तर दुसरा टप्पा १० मार्च ते ४ एप्रिल दरम्यान चालला. या अधिवेशनात अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

# चक्रवर्ती सम्राट अशोक: अशोका द ग्रेट




**चैत्र शुक्ल अष्टमी रोजी दरवर्षी भारतामध्ये चक्रवर्ती सम्राट अशोकांची जयंती साजरी केली जाते. बिहार सरकारने २०१६मध्ये दि.१४ एप्रिल रोजी आंबेडकर जयंतीच्या दिवशीच अशोक जयंती असल्याचा शोध घेऊन साजरी केली होती. दि.४ एप्रिल २०१७ मध्ये सम्राट अशोकांची २,३२१ वी जयंती साजरी करण्यात आली. यावरून आज ती २,३२९वी आहे. हे तीनही दिवस भारतीय तिथीनुसार चैत्र शुक्ल अष्टमी आहेत. ज्ञानवर्धक संकलित लेख श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरुजींच्या शब्दांत प्रस्तुत...**

**(५ ते १४ एप्रिल: अशोकाष्टमी- सम्राट अशोक जयंती सप्ताह विशेष.)**

सम्राट अशोक मौर्य यांचा जन्म इ.स.पू.३०४मध्ये झाला असावा असा अंदाज वर्तवला जातो. हे भारतीय सम्राट आणि मौर्य घराण्यातील तिसरे शासक होते. त्यांनी प्राचीन भारतावर इ.स.पू. २७२ – इ.स.पू. २३२ दरम्यान राज्य केले. त्यांना चक्रवर्ती सम्राट अशोक, महान अशोक आणि अशोक द ग्रेट नावांनीही ओळखले जाते. अशोक हे भारतीय इतिहासातील सर्वात महत्त्वाचा लोककल्याणकारी राजा ज्यांनी अखंड भारताचा बहुतांश भाग काबीज केला होता. आपल्या सुमारे ४० वर्षांच्या विस्तृत राज्यकाळात त्यांनी पश्चिमेकडे अफगाणिस्तान व थोडा इराण, पूर्वेकडे आसाम तर दक्षिणेकडे म्हैसूरपर्यंत आपल्या राज्याचा विस्तार केला. त्यांना सम्राट अशोक मौर्य, धम्माराखित, धर्माराजिका, धम्माराजिका, धम्मारज्ञ, चक्रवर्तीं, सम्राट, राज्ञश्रेष्ठ, मगधराज, देवानाम प्रिय:, प्रियदर्शी, भूपतिं, मौर्यराजा, धमर्शोक, धम्मशोक, असोक्कध्हन, अशोकवर्धन, प्रजापिता, धम्मानायक, धर्मनायक, अशोक महान अशा अनेक नावाने ओळखले जाते.

बालपण व सुरुवातीची कारकीर्द: अशोक हा बिंदुसार या मौर्य सम्राटाचा पुत्र होता. बिंदुसार यांना अनेक पत्नी होत्या, त्यातील धर्मा ही अशोकची आई होती. अशोक हा बिंदुसाराच्या अनेक पुत्रांमध्ये शेवटून दुसरा होता. त्यामुळे अशोक मौर्य सम्राट बनेल अशी कोणाचीच अपेक्षा नव्हती. परंतु अशोकची सेनानी बनण्याची क्षमता वादातीत होती. त्यामुळे साहजिकच इतर भावांचा त्यावरील दुःस्वास वाढला होता. चंद्रगुप्त मौर्याने जेव्हा जैन धर्म स्वीकारून राज्य सुखाचा त्याग केला, त्यावेळेस त्याने तलवार फेकून दिली. ही तलवार शोधून अशोकाने आपल्याजवळच ठेवली. अशोक लहानपणी अतिशय तापट व खोडकर होता. तसेच चांगला शिकारीही होता. त्याला तत्कालीन राजपुत्रांना मिळणारे सर्व शिक्षण मिळाले होते. त्याच्यातील सेनानीचे गुण ओळखून बिंदुसाराने तरुणपणी त्याला अवंतीचा उठाव मोडण्यास पाठवले होते, हे काम त्याने सहज पार पाडले. अशोकाच्या आईचे नाव काही ठिकाणी चंपा असे आले आहे आणि ती एका राज्याची मुलगी होती असा उल्लेख काही लेखक करतात. प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये एक महान चक्रवती सम्राट म्हणून अशोकाला मान्यता मिळालेली आहे तत्कालीन अशोकाचे शिलालेख, वास्तु हे याची साक्ष देणारे महत्त्वपूर्ण साधने आहेत. सम्राट अशोक हे जगातील सर्वात महान सम्राट होते. सम्राट अशोकांना भारताच्या इतिहासातही सर्वात महान व शक्तिशाली सम्राट म्हणून स्थान दिले आहे. प्राचीन भारताच्या परंपरेत चक्रवर्ती सम्राटांची पदवी ज्यांनी जनमानसावर तसेच भारताच्या मोठ्या भूभागावर राज्य केले अशाच महान सम्राटांना दिली जाते. सम्राट अशोकांना चक्रवर्ती सम्राट असे म्हणतात, चक्रवर्ती सम्राट म्हणजे सम्राटांचा सम्राट. जगाच्या इतिहासात असे अनेक सम्राट होउन गेले ज्यांचे उल्लेख प्राचीन ग्रंथांमध्ये आहेत परंतु त्यांच्या अस्तित्वाबाबतची साशंकता आहे. असे मानतात की प्राचीन चक्रवर्ती सम्राटांच्या पंक्तीतील सम्राट अशोक हेच असे पहिले आणि शेवटचे महान चक्रवर्ती सम्राट झाले त्यानंतर कोणीही त्या तोडीचा राज्यकर्ता भारतात झाला नाही. सम्राट अशोकांनी अखंड भारताच्या बहुतांशी भागावर राज्य केले. आजचा पाकिस्तान, अफगाणिस्तान पूर्वेकडे बांग्लादेश ते दक्षिणेकडे केरळ पर्यंत तसेच नेपाळ, भूतान इराण, ताजिकिस्तान आणि तुर्कमेनिस्तान या देशांमध्ये अशोकांच्या साम्राज्याच्या सीमा होत्या. अत्यंत शूर असे सम्राट अशोक आपल्या आयुष्यात एक ही युद्ध हरले नाहीत. कलिंगाच्या युद्धातील महासंहारानंतर कलिंग काबीज झाला, जे कोणत्याही मौर्य राज्यकर्त्यास पूर्वी जमले नव्हते. त्यांच्या राज्याचे केंद्रस्थान ज्याला बिहार म्हणतात तो मगध होता, व आज पटणा म्हणून ओळखली जाणारी पाटलीपुत्र ही त्यांची राजधानी होती. काही इतिहासकारांच्या मते यात साशंकता आहे. कलिंगाच्या युद्धात झालेल्या मनुष्यहानी पाहून त्यांनी प्रचलित वैदिक परंपरा झुगारून हिंसेचा त्याग केला आणि मानवतावादी बौद्ध धर्माचा स्वीकार केला व नंतरच्या आयुष्यात त्यांनी स्वतःला बौद्ध धर्माच्या प्रसारास समर्पित केले. सम्राट अशोकांनी बौद्ध धर्म संपूर्ण आशिया खंडात तसेच इतर प्रत्येक खंडात पसरवला होता. अशोकांच्या संदर्भातील अनेक शिलालेख भारताच्या काना कोपऱ्यात सापडतात त्यामुळे अशोकांबाबतची उपलब्ध ऐतिहासिक माहिती भारताच्या प्राचीन काळातल्या कोणत्याही ऐतिहासिक व्यक्तीपेक्षा अधिक आहे. सम्राट अशोक सत्य, अहिंसा, प्रेम, सहिष्णूता आणि शाकाहारी जीवनप्रणीली यांचे थोर पुरस्कर्ते होते म्हणूनच एक अतिशय परोपकारी प्रशासक अशीच इतिहासात त्यांची ओळख झाली आहे. अशोकाने आपल्या प्रजाजनांना व प्रशासकीय अधिकाऱ्यांना आपल्या शीलालेखातून काही राजाज्ञा दिलेल्या आहेत. अशोकाचे शिलालेख हे मौर्य इतिहासाचे महत्त्वाचे साधन म्हणून ओळखले जाते. सर्वप्रथम ब्रिटिश अभ्यासक जेम्स प्रिन्सेप यांना अशोकाचे शिलालेख सन १८३७मध्ये वाचता आले. ते अनेक भाषांचे अभ्यासक होते. अशोकाचे शिलालेख हे ब्राह्मी, खरोष्टी आणि अरेमाइक या तीन लिपींमध्ये आढळलेले आहेत. त्यातील अनेक अभिलेख हे ब्राह्मी लिपीतील असून ते जेम्स प्रिन्सेप यांनी वाचले, त्यातूनच या चक्रवर्ती सम्राटाच्या आयुष्याची आणि एकूणच मौर्य साम्राज्याविषयीची सखोल माहिती हीअभ्यासकांना मिळालेली आहे अशोकाने आपल्या शिलालेखामध्ये स्वतःला 'देवानाम प्रिय' असे संबोधले आहे. कलिंग युद्ध कलिंग युद्धानंतर त्याचे झालेले मनपरिवर्तन, त्याने स्वीकार केलेल्या बौद्धधर्म, बौद्ध धर्माची तत्त्वे आणि एकूणच धर्मप्रसाराचे कार्य महान आहे, मात्र यांची नेमणूक या सर्व घटनांचा उल्लेख हा शिलालेखात आलेला आहे. सम्राट अशोक हा या काळातील भारतातील पहिला चक्रवर्ती राजा होय सम्राट याचा अर्थ ज्याचा रथ घोडा चारी दिशांना कुणीही अडवू शकत नाही असा पराक्रमी शासक व विजेता होय सम्राट अशोकाने प्रशासकीय संदर्भाने अनेक महत्त्वपूर्ण बदल केले प्रशासनामध्ये महामांत्रा हे पद निर्माण करून धर्मप्रसाराला उत्तेजन दिले आपल्या मुलांनादेखील धर्मप्रसारासाठी त्यांनी देशाबाहेर जाण्यासाठी प्रेरणा दिली प्रजा कल्याणाचे हेतूने अनेक उपक्रम हाती घेतले अनेक ठिकाणी धर्मशाळा बांधल्या रस्त्याच्या दुतर्फा झाडी लावून लोकांना आवश्यक त्या सुविधा देण्याचा प्रयत्न केला.



– संकलन व शब्दांकन –
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा–
७७७५०४१०८६.

**राज्यारोहण: सम्राट अशोकच्या काळातील मौर्य साम्राज्याचा विस्तार**

अशोक जसजसा सेनानी म्हणून परिपक्व होत गेला तसतसे त्याच्या भावांचा त्यावरील दुःस्वासही वाढत गेला. अशोकांनी मौर्य सैन्याच्या अनेक तुकड्यांचे यशस्वीपणे नेतृत्व केले होते. तसेच त्यांच्या एका मागोमागच्या मोहिमांमुळे त्यांची राज्यभर कीर्ती दुमदुमू लागली. त्यामुळे त्याच्या भावांना असे वाटले की बिंदुसार अशोकला सम्राट बनण्यास प्राधान्य देतील. बिंदुसारचा ज्येष्ठ पुत्र सुसीम हा अशोकचा दुःस्वास करण्यात आघाडीवर होता. सुसीमने अशोकला व्यस्त ठेवण्यासाठी जेथे सुसीम अधिकारी असताना अनेक उठाव झाले होते तेथे, तक्षशिला येथील मोहिमेवर पाठवण्यास सांगितले. अशोक येण्याच्या बातमीने उठाव शमला व अशोकची कीर्ती अजून वाढत गेली. त्या भागात पुन्हा उठाव झाला परंतु तो क्रूरतेने चिरडला गेला. अशोकांच्या यशाने त्यांच्या भावांचा दुःस्वास अजून वाढला, घरातील वाढत्या अशांततेमुळे व सुसीमने बिंदुसारला अशोकाविरुद्ध भडकावले, या वादातून तात्पुरता मार्ग म्हणून बिंदुसारने अशोकला काही काळ अज्ञातवासात जाण्याचा सल्ला दिला, तो त्यांनी पाळला. या काळात अशोकने कलिंगमध्ये जाऊन वास्तव्य केले. या काळात त्यांची कौरवाकी या कोळी मुलीशी ओळख झाली. ती नंतर अशोकची दुसरी अथवा तिसरी पत्नी बनली. अशोकच्या काही कोरीवकामांवर तिचे उल्लेख आहेत. मध्यंतरीच्या काळात उज्जैन मध्ये हिंसक उठाव झाला, बिंदुसारने अशोकला अज्ञातवासातून बाहेर येऊन हा उठाव शमवण्यास सांगितले. अशोक उज्जैनला गेला व एका लढाईत घायाळ झाला. त्या काळात असे मानतात की सुसीमद्वारे अशोकवर अनेक हिंसक हल्ले झाले, जे परतावून लावण्यात आले. अशोकची शुश्रूषा करण्यासाठी बौद्धधर्मी परिचारकांची नेमणूक करण्यात आली होती. यातील एक परिचारिका देवी हिच्याशी अशोकचा विवाह झाला. देवी ही विदिशा येथील एका व्यापाऱ्याची मुलगी होती. ती बौद्धधर्मी असल्याने बिंदुसाराला हा विवाह पसंत पडला नाही. त्याने अशोकला पाटलीपुत्रमध्ये रहाण्यास मनाई केली व अशोकला उज्जैन येथील प्रमुख करून टाकले. अशोकांची पुढील काही वर्षे शांततामय गेली. बिंदुसारचे इसवी सनपूर्व २७३मध्ये निधन झाले व सुसीम अशोकचा काटा काढण्यास अजून सक्रिय झाला. या प्रयत्नांत देवीवर प्राणघातक हल्ला करण्यात आला, त्यात अशोकची आई मारली गेली. या घटनेने संतप्त झालेल्या अशोकाने पाटलीपुत्रवर आक्रमण केले व लवकरच पाटलीपुत्रचा पाडाव केला. आपल्या सर्व बंधूंची हत्या केली. यानंतर अशोकाची महत्त्वाकांक्षा वाढीस लागली. मगध साम्राज्याचा सम्राट बनून त्याने अनेक प्रांत एकामागोमाग पार करण्याचा सपाटा लावला. या काळात अशोकला चंड–अशोक म्हणू लागले व एक क्रूरकर्मा अशी त्याची ओळख तयार होऊ लागली. राज्यरोहण झाल्यानंतर आठ वर्षांच्या काळात अशोकने अनेक प्रदेश मगध साम्राज्याला जोडले व मौर्य साम्राज्याचा विस्तार पूर्वेस ब्रम्हदेशाच्या सीमेपर्यंत तर पश्चिमेकडे बलुचिस्तान–इराणच्या सीमेपर्यंत, उत्तरेस अफगाणिस्तान व दक्षिणेस केरळ पर्यंत वाढवला. जवळपास सर्व भारत त्याने एका साम्राज्याच्या छायेत

पान ३ वर

# एक बाणी, एक वचनी, मर्यादा पुरुषोत्तम असे प्रभू श्रीराम



**राम नवमी हा एक हिंदू सण आहे जो हिंदू धर्मातील सर्वात आदरणीय आणि पूज्य देवतांपैकी एक असलेल्या भगवान रामाच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. हिंदू महाकाव्य रामायणमध्ये भगवान रामाच्या जीवनाचा आणि शिकवणींचा महत्त्वपूर्ण भाग समाविष्ट आहे. त्यांना भगवान विष्णूचे सातवे स्वरूप मानले जाते. चैत्राच्या नवव्या दिवशी, जे ग्रेगोरियन कॅलेंडरमध्ये सहसा मार्च किंवा एप्रिलमध्ये येते, राम नवमी उत्सव साजरा केला जातो. जगभरातील हिंदू, परंतु विशेषतः भारतात, ही सुट्टी मोठ्या उत्साहाने आणि भक्तीने पाळतात. रामनवमीच्या उत्सवामध्ये विविध विधी आणि परंपरांचा समावेश आहे, ज्या प्रत्येक प्रदेशानुसार बदलतात. तरीही, सणाचे मूलभूत महत्त्व – भगवान रामाचे जीवन आणि शिकवण साजरे करणे आणि आनंदी आणि फलदायी जीवनासाठी त्यांच्या आशीर्वादांची विनंती करणे – समान आहे.**

रामनवमीच्या उत्सवाची उत्पत्ती प्राचीन काळापासून शोधली जाऊ शकते जेव्हा भगवान रामाचा जन्म सध्याच्या उत्तर प्रदेश, भारतातील अयोध्या शहरात झाला होता. हिंदू पौराणिक कथेनुसार, भगवान रामाचा जन्म चैत्र महिन्याच्या नवव्या दिवशी राजा दशरथ आणि राणी कौशल्या यांच्या पोटी झाला होता, म्हणूनच या दिवशी हा सण साजरा केला जातो. भगवान राम हे धार्मिकता, सत्य आणि सद्गुण यांचे मूर्त स्वरूप मानले जातात आणि त्यांचे जीवन आणि शिकवण हे जगभरातील हिंदूंसाठी प्रेरणास्थान मानले जाते. त्यांचे जीवन आणि शिकवण हिंदू महाकाव्य रामायणात आहे, जो हिंदू धर्मातील सर्वात महत्वाचा आणि आदरणीय ग्रंथ आहे. रामनवमीचे महत्त्व या वस्तुस्थितीत आहे की ते भगवान विष्णूचा अवतार मानल्या जार्णाया रामाचा जन्म साजरा करतात. भगवान विष्णू हे हिंदू धर्मातील तीन मुख्य देवतांपैकी एक आहेत आणि त्यांच्या अवतारांना धर्म (धार्मिकता) पुनर्संचयित करण्यासाठी आणि वाईटाचा पराभव करण्यासाठी पृथ्वीवर पाठवले गेले असे मानले जाते. रामनवमीचा उत्सव प्रदेशानुसार बदलतो, परंतु भगवान रामाची भक्ती आणि श्रद्धेची मूळ थीम तीच राहते. हा सण जगभरातील हिंदू मोठ्या उत्साहाने आणि भक्तिभावाने साजरा करतात. उत्सव भक्त सामान्यतः कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपवास पाळतात, संध्याकाळी भगवान रामाची पूजा (पूजा) केल्यानंतरच तो तोडतात. पुष्प, फळे, मिठाई आणि इतर श्रद्धांजली अर्पण करताना पूजेमध्ये भगवान रामाची स्तुती गाणे समाविष्ट असते.

भारताच्या काही भागात रामनवमीच्या निमित्ताने कल्याणोत्सवम नावाचा एक विशेष विधी केला जातो. यामध्ये भगवान राम आणि त्यांची पत्नी सीता यांचा प्रतीकात्मक विवाह आणि देवतांना विशेष मिठाई आणि स्वादिष्ट पदार्थांचा प्रसाद यांचा समावेश आहे. रामनवमीशी संबंधित आणखी एक महत्त्वाची परंपरा म्हणजे रामायणाचे पठण, महाकाव्य जे भगवान रामाचे जीवन आणि शिकवण यांचे वर्णन करते. हे सहसा कथा (कथन) पठणाच्या स्वरूपात केले जाते, ज्यामध्ये मोठ्या संख्येने भक्त उपस्थित असतात. भारताच्या काही भागांमध्ये, रामनवमीच्या दिवशी मिरवणुका काढल्या जातात, भक्त रथ किंवा पालखीवर भगवान राम आणि सीता यांच्या मूर्ती घेऊन जातात आणि त्यांच्या स्तुतीमध्ये भजन आणि भक्तिगीते गातात.

निष्कर्ष: रामनवमी हा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा सण आहे, जो हिंदू धर्मातील सर्वात आदरणीय आणि पूज्य देवतांपैकी एक, भगवान रामाची जयंती साजरी करतो. जगभरातील हिंदू हा सण मोठ्या उत्साहाने आणि भक्तिभावाने पाळतात आणि भारताचा समृद्ध आणि वैविध्यपूर्ण सांस्कृतिक वारसा दर्शवणाऱ्या रीतिरिवाज आणि विधींनी तो भरलेला आहे. हा सण धार्मिकता, सत्याच्या महत्त्वाची आठवण करून देतो

**प्रभू रामाचा प्रवास :** प्रभू रामाचा प्रवास सुरू झाला जेव्हा त्यांना त्यांचे वडील राजा दशरथ यांनी त्यांच्या सावत्र आई कैकेयीच्या विनंतीवरून त्यांच्या अयोध्या राज्यातून हद्दपार केले. प्रभू राम आपली पत्नी सीता आणि भाऊ लक्ष्मणासह वनवासात गेले. आपल्या वनवासाच्या काळात, प्रभू रामाला विविध आव्हानांना सामोरे जावे लागले, ज्यात राक्षसांशी लढाई आणि राक्षस राजा रावणाने अपहरण केलेली त्यांची पत्नी सीता गमावली.

प्रभू रामाने आपला विश्वासू मित्र हनुमान आणि त्याच्या वानरांच्या सैन्याच्या मदतीने रावणाशी भयंकर युद्ध केले आणि शेवटी त्याचा पराभव केला. सीतेची सुटका केल्यानंतर, प्रभू राम अयोध्येला परतले आणि राज्याचा राजा म्हणून त्यांचा राज्याभिषेक झाला. त्याने आपल्या लोकांचे प्रेम आणि आदर मिळवून करुणा आणि न्यायाने राज्य केले.

प्रभू रामाची शिकवण : जगभरातील कोट्यवधी लोक भगवान रामाच्या जीवनावर आणि शिकवणीला खूप महत्त्व देतात. त्याची शिकवण देवावर निष्ठा, सत्य आणि धार्मिकता या मूल्यांवर आधारित आहे. प्रभू रामाचे जीवन आपल्याला खरे मित्र, न्यायी आणि दयाळू शासक बनण्यास आणि आपल्या पालकांना आणि भावंडांवर प्रेम आणि आदर करण्यास शिकवते. त्याच्या शिकवणी धार्मिकतेच्या मार्गाचे अनुसरण करण्याच्या महत्त्वावर आणि आपले ध्येय साध्य करण्यासाठी आत्म–नियंत्रण, संयम आणि चिकाटीच्या महत्त्वावर जोर देतात.

प्रभू रामाचा संदेश : भगवान रामाचा मानवतेला संदेश आहे की सतत न्याय, दया आणि ईश्वरभक्तीपूर्ण जीवन जगणे. त्याची शिकवण इतरांबद्दल सहानुभूती आणि आदर दाखवण्याच्या गरजेवर आणि गरजूंना मदत करण्याच्या गरजेवर जोर देते. जगभरातील कोट्यवधी लोक भगवान रामाच्या जीवनातून आणि शिकवणींनी प्रेरित होत आहेत आणि त्यांचा न्याय, करुणा आणि प्रेमाचा संदेश लोकांना चांगल्या जीवनाकडे नेत आहे.

भगवान राम, ज्यांना श्री राम किंवा राम म्हणून देखील ओळखले जाते, हे हिंदू धर्मातील परिपूर्णता आणि आदर्शवादाचे मूर्त स्वरूप मानले जाते. ते सर्वात आदरणीय देवतांपैकी एक आहेत आणि त्यांचे जीवन आणि शिकवणी जगभरातील लाखो लोकांना प्रेरणा देत आहेत. प्रभू राम त्यांच्या करुणा, धार्मिकता, धैर्य आणि शहाणपणासाठी ओळखले जातात आणि त्यांचे जीवन लोकांसाठी एक उदाहरण आहे. या लेखात, आपण प्रभू रामाचे जीवन आणि त्यांना एक आदर्श व्यक्तिमत्व बनवणाऱ्या गुणांचा शोध घेऊ.

**जन्म आणि बालपण :** भगवान रामाचा जन्म अयोध्या या प्राचीन शहरामध्ये झाला, जो सध्याच्या उत्तर प्रदेश, भारतामध्ये आहे. तो राजा दशरथ आणि राणी कौशल्ये यांचा ज्येष्ठ पुत्र होता आणि भगवान विष्णूचा पुनर्जन्म मानला जात असे. त्यांचा जन्म हिंदू महिन्याच्या चैत्र महिन्याच्या नवव्या दिवशी, जो मार्च किंवा एप्रिलमध्ये येतो, राम नवमी म्हणून साजरा केला जातो.

भगवान राम यांनी त्यांचे बालपण अयोध्येच्या राजवाड्यात घालवले, जिथे त्यांनी विविध कला, विज्ञान आणि युद्धकलेचे उत्कृष्ट शिक्षण आणि प्रशिक्षण घेतले. तो एक समर्पित मुलगा, भाऊ आणि मित्र देखील होता आणि त्याचे त्याच्या भावंड आणि चुलत भावांसोबत घनिष्ठ संबंध होते.

**विवाह आणि वनवास :** प्रभू राम मोठे झाल्यानंतर त्यांनी मिथिला राज्याची राजकन्या सीता हिच्याशी विवाह केला. सीता तिच्या सौंदर्य, शहाणपणा आणि प्रभू राम भक्तीसाठी ओळखली जात होती आणि त्यांचा विवाह हिंदू पौराणिक कथांमधील सर्वात आशीर्वादित संघांपैकी एक मानला जातो. पण काही काळानंतर, भगवान रामाचे वडील राजा दशरथ यांनी त्यांच्या एका पत्नीला केलेल्या नवसामुळे त्यांना चौदा वर्षांसाठी अयोध्येतून बळजबरीने हद्दपार केले. प्रभू राम, सीता आणि त्यांचा भाऊ लक्ष्मण यांच्यासह स्वेच्छेने वनवासात गेले आणि पुढील चौदा वर्षे विविध आव्हाने आणि धोक्यांना तोंड देत भारतातील जंगलात राहिली.

**वाईटावर विजय :** प्रभू रामाच्या जीवनातील सर्वात प्रसिद्ध घटनांपैकी एक म्हणजे राक्षस राजा रावणावर त्याचा विजय, ज्याने सीतेचे अपहरण केले आणि तिला लंकेच्या राज्यात नेले. प्रभू रामाने आपला विश्वासू मित्र हनुमान आणि वानर आणि अस्वलांच्या सैन्याच्या मदतीने रावण आणि त्याच्या सैन्याविरूद्ध भयंकर युद्ध केले आणि शेवटी विजय मिळवला. रावणावर रामाचा विजय हा वाईटावर चांगल्याचा विजय म्हणून साजरा केला जातो आणि लोकांसाठी अत्याचार आणि अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याचे उदाहरण म्हणून काम केले जाते.

प्रभू रामाचे शौर्य, दृढनिश्चय आणि त्यांच्या पत्नीवरील भक्ती हे खरे प्रेम आणि वचनबद्धतेचे उदाहरण म्हणून पाहिले जाते. अयोध्या आणि राजसत्तेकडे परत या: चौदा वर्षांचा वनवास संपवून, प्रभू राम अयोध्येला परतले, जिथे त्यांचे लोक मोठ्या आनंदाने आणि उत्सवाने स्वागत करत होते. त्यांना अयोध्येचा राजा म्हणून गौरवण्यात आले आणि त्यांनी करुणा आणि अंतर्दृष्टीने शासन करून आपल्या लोकांचे कल्याण आणि समृद्धी सुनिश्चित केली.

प्रभू रामाचा कारभार हा भारतीय इतिहासातील सुवर्णकाळ मानला जातो, जो शांतता, समृद्धी आणि न्यायासाठी ओळखला जातो. धार्मिकता, कर्तव्य आणि नैतिकतेवर जोर देणाऱ्या धर्माच्या तत्त्वांचे पालन करण्यासाठीही तो ओळखला जातो. रामनवमीचे महत्त्व हिंदू महाकाव्य रामायणात आहे, जे भगवान रामाच्या जीवनाची आणि राक्षसी राजा रावणाच्या विरुद्धची लढाई सांगते. भगवान राम त्यांच्या धर्माचे पालन (धार्मिकता) आणि त्यांच्या कर्तव्याप्रती अटळ भक्तीसाठी ओळखले जातात. त्यांना एक आदर्श राजा, पती, मुलगा आणि भाऊ मानले जाते आणि त्यांचे जीवन सर्व हिंदूंसाठी एक आदर्श आहे.

# शहराच्या स्वच्छतेमध्ये महिला कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान

**उद्यान अधीक्षक व घनकचरा प्रमुख विजय पाटील यांचे प्रतिपादन**



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आजघडीला शहर आपल्याला स्वच्छ दिसत आहे. शहराच्या स्वच्छतेमध्ये महिला कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान मोठे आहे, असे प्रतिपादन महानगरपालिकेचे उद्यान अधीक्षक व घनकचरा प्रमुख विजय पाटील यांनी व्यक्त केले केले. ते छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि एकोसत्त्व एनवायरनमेंट सोल्यूशन्सतर्फे तिरूमला मंगल कार्यालयात आयोजित विशेष सन्मान सोहळ्यात बोलत होते. 'हम होंगे कामयाब' आणि 'स्टार्ट अ लिटिल गुड' या उपक्रमांतर्गत हा गौरव सोहळा अत्यंत उत्साहाच्या वातावरणात पार पडला.

या विशेष सोहळ्यास विविध मान्यवरांनी उपस्थित राहून आपले विचार मांडले. उद्यान अधीक्षक आणि घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख विजय पाटील, सहाय्यक आयुक्त आणि वॉर्ड अधिकारी राहुल जाधव व प्राजक्ता वंजारी, तसेच इकोसत्व संस्थेच्या संचालिका गौरी मिराशी-शिरसाठ व सीओओ प्रियांका वाजे, यांनी या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती लावली. 'शहर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने योगदान देणे आवश्यक आहे,' असे प्रतिपादन इकोसत्वचे प्रकल्प व्यवस्थापक ज्ञानदीप अग्निहोत्री यांनी केले. त्यांनी ओला, सुका आणि हानिकारक कचऱ्याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. या उपक्रमाला हिंदुस्तान युनिलिव्हर, एसबीआय फाउंडेशन, झेंटीओ इंडिया प्रायवेट लिमिटेड आणि एकोसत्त्व एनवायरनमेंट सोल्यूशन्स यांसारख्या संस्थांनी सहकार्य केले. सोहळ्यामुळे शहर स्वच्छ आणि आरोग्यदायी ठेवण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन कार्य करण्याचा संदेश देण्यात आला. हा सोहळा झिरो वेस्ट करण्यासाठी उन्नती वेस्ट मॅनेजमेंट सर्विस यांनी सहकार्य केले.

**शहर स्वच्छतेसाठी योगदान देणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांचा विशेष सन्मान**

कार्यक्रमादरम्यान, शहर स्वच्छतेसाठी महिला सफाई कर्मचाऱ्यांनी दिलेल्या योगदानाचा गौरव करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांनी प्रभावी कचरा व्यवस्थापन, स्वच्छता मोहिमांवर भर देण्याचे आवाहन केले. इकोसत्व व्यवस्थापक अक्षय गणाचार्य, सह-व्यवस्थापक साकेत कुलकर्णी, जितेंद्र भाले तसेच शहर समन्वयक व मनपा स्वच्छता निरीक्षक यांच्यासह अनेक मान्यवरांनी या सोहळ्यात सहभाग घेतला.

पान २ वरून
# चक्रवर्ती सम्राट अशोक: अशोका द ग्रेट

आणला व आपली एकछत्री सत्ता लागू केली. संपूर्ण हिंदुस्थानात एकछत्री साम्राज्य उभारणारा चक्रवर्ती सम्राट म्हणून अशोकाच्या नावाचा उल्लेख करावा लागतो रोमिला थापर यांनी अशोकाच्या कार्याचा विशेष गौरव केलेला आहे.

बौद्ध धम्माचा स्वीकार व प्रसार: अशोकांनी कलिंगचे युद्ध पार पडल्यानंतर जिकलेल्या रणांगणाची व शहरांची पहाणी करायची ठरवली, व त्यावेळेस त्याने फक्त सर्वत्र पडलेले प्रेतांचे ढीग, सडण्याचा दुर्गंध, जळलेली शेती, घरे व मालमत्ता पाहिली. ते पाहून अशोकाचे मन उदास झाले व यासाठीच का मी हे युद्ध जिंकले, व हा विजय नाही तर पराजय आहे, असे म्हणून स्वतःला त्या प्रचंड विनाशाचे कारण मानले. हा पराक्रम आहे की दंगल? बायका मुले व इतर अबलांच्या हत्या कशासाठी? आणि यात कसला पराक्रम? असे स्वतःलाच प्रश्न विचारले. एका राज्याची श्रीमंती वाढवण्यासाठी दुसऱ्या राज्याचे अस्तित्वच हिरावून घ्यायचे? ह्या विनाशकारी युद्धानंतर शांती, अहिंसा, प्रेम, दया ही मूलभूत तत्त्वे असलेला बौद्ध धर्मीयांचा मार्ग अशोकाने

अवलंबायचे ठरवले. त्याने स्वतः बौद्ध धर्माचा प्रसारक म्हणूनही काम करायचे ठरवले. यानंतर अशोकाने केलेले कार्य त्याला इतर कोणत्याही महान सम्राटांपेक्षा वेगळे ठरवतात. ज्यात क्रूरकम र्ा राज्यकर्त्याचे महान दयाळू सम्राटात रूपांतर झाले. अशी कलिंगचे युद्ध ही इतिहासातील एक अतिशय वेगळी घटना समजली जाते. बौद्ध धर्माचा जगभर झालेल्या प्रसारास खूप मोठ्या प्रमाणावर अशोकाने केलेले कार्य जबाबदार होते असे बहुतेक इतिहासकार मानतात. अशोकाने पाटलीपुत्र येथे बौद्ध धर्माची तिसरी परिषद बोलावली होती बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी अशोकाने आपला मुलगा म हेंद्र आणि मुलगी संघमित्रा यांना श्रीलंकेत पाठवले अग्नीय अशिया आणि मध्य आशिया येथील देशांम ध्ये त्याने धर्मप्रसारासाठी बौद्ध भिक्खू पाठवले होते त्याने अनेक स्तूप आणि विहार बांधले त्याचप्रम ाणे अशोकाने अनेक सोई निर्माण करण्यावर भर दिला उदाहरणार्थ माणसांना तसेच पशूंना मोफत औषध उपचार मिळावे याची त्यांनी सोय केली होती अनेक नवे रस्ते बांधले प्रवासामध्ये लोकांना सावली मिळावी यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना झाडे लावली नव्या धर्मशाळा बांधल्या विहिरी खोदल्या अशा प्रकारे त्यांनी अनेक लोकोपयोगी आणि कल्याणकारी कार्य केलं होतं, त्याचप्रमाणे बौद्ध धम्माचा मोठा प्रसार आणि प्रचार करण्याचे कामही अशोकांनी केले. सन १९७१ साली सम्राट अशोकाचा एक लघु शिलालेख मध्य प्रदेशातील पांगुरारीया प्रत्यक्षात नक्तितालाई या खेड्याजवळ सापडला. या शिलालेखातील मजकुराचे योग्य भाषांतर जर्मनीतील प्राध्यापक हॅरी फाल्क यांनी केल्यानंतर वरील समजुतीला छेद मिळाला असून सम्राट अशोक तरुणपणापासूनच बौद्ध विचारधारा म ानणारे होते, हे सिद्ध झाले आहे. राजकुमार अशोक उज्जैन प्रांताचा अधिकारी असताना आपल्या मैत्रिणीसोबत नक्तितालाई येथे सहलीला आले होते, असे या शिलालेखात लिहिलले आढळले आहे. या ठिकाणी बौद्ध भिक्षु संघाचे वास्तव्य होते, याचे अनेक पुरावे आजही येथे पहायला मिळतात.

अशोकांच्या या कार्यात त्याला देवीपासून झालेल्या मुलांची मोठी मदत झाली. अशोकांचा मुलगा महेंद्र व मुलगी संघमित्रा यांनी भारताबाहेर श्रीलंकेत जाऊन तेथील राजाला बौद्ध धम्माची शिकवण दिली, यामुळे भारतापुरता मर्यादित राहिलेला हा धम्म भारताबाहेर पसरण्यास सुरुवात झाली. असे मानतात की अशोकांनी बौद्धधम्म ीयांसाठी हजारो स्तूपांची व विहारांची निर्मिती केली. त्यांतील काही स्तूपांचे अवशेष आजही पहावयास मिळतात. यातील मध्यप्रदेशात सांची येथील स्तूप प्रसिद्ध आहे, हा स्तूप अशोकांनी बांधला असे मानतात. अशोकांनी आपल्या कारकिर्दीतील पुढील वर्षांमध्ये अहिंसा हे राष्ट्रीय धोरण बनवले, जंगलाम ध्ये चैनीसाठी होणारी प्राण्यांची शिकारीवर बंदी आणली, प्राण्यांवर होणाऱ्या कोणत्याही प्रकारची हिंसकतेवरही बंदी आणली तसेच शाकाहाराला प्रोत्साहन देण्यात आले. शिक्षा मिळालेल्या कैद्यांना अशोकांनी सहिष्णूपणे वागवले. गुणी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणासाठी अनेक विद्यापीठे तसेच, शेतकऱ्यांसाठी पाण्याचे कालवे बांधले. त्यांच्या राज्यात सर्व प्रकारच्या जातिधर्माच्या लोकांना सहिष्णुरीत्या वागवले जाई. अशोकांनी आपले एकेकाळी ज्याच्यांशी युद्धे केली त्यांच्याशीही मैत्रिपूर्ण संबध वाढवले. सम्राट अशोकांनी अनेक समाजोपयोगी कार्ये केली. अशोकांनी आपल्या कारकिर्दीत राज्यात अनेक रुग्णालये व महामार्गाचे जाळे निम र्ाण केले, रस्त्यांच्या कडेला वृक्षांची लागवड ही अशोकांचीच कल्पना आहे, असे मानतात. आपण सम्राट असल्याच्या अधिकाराचा फायदा त्यांनी सम ाजोपयोगी कार्यासाठी केला. त्यानंतर अशोकांना धम्मअशोक असे म्हणू लागले. अशोकांनी धम्म ाची प्रमुख आचारतत्त्वे विशद केली, अहिंसा, सर्व जातिधर्मांबद्दल सहिष्णुता, वडिलधाऱ्या माणसांना मान देणे, संतांना, शिक्षकांना योग्य तो मान देणे, दासांना माणुसकीने वागवणे. अशा आचारतत्त्वांना जगात कोणताही समाज नाकारू शकणार नाही.

अशोकांच्या इतिहासकारांनुसार त्याने कलिंगाच्या युद्धानंतर कोणतेही प्रमुख युद्ध छेडले नाही, परंतु त्यांना शेजारी राष्ट्रांशी ग्रीक राज्ये, चोल साम्राज्य याच्याशी नेहमी युद्धाची शक्यता वाटत होती. परंतु अशोकांनी पूर्वायुष्यातील केलेल्या मोहिमांमुळे व मगधच्या सामर्थ्यामुळे बौद्ध धम्म स्वीकारला तरी त्यांच्या शेजारी राज्यांनी त्यांना छेडण्याचे साहस केले नाही. तसेच बौद्ध धरम्म स्वीकारला, अहिंसा हे राष्ट्रीय धोरण बनवले तरी म गधाचे सैनिकी सामर्थ्य अबाधित ठेवले. अशोकाला ग्रीक जगताची माहिती होती, असे कळते. तसेच चंद्रगुप्त मौर्याने केलेल्या ग्रीकांविरुद्धच्या मोहिमांमुळे मौर्य साम्राज्याची कीर्ती ग्रीस, इजिप्तपर्यंत पोहोचली होती असे कळते. इतिहासकारांच्या मे त्यांचा मृत्यू इ.स.पू.२३२मध्ये झाला.

!! चक्रवर्ती सम्राट अशोकांना अशोकाष्टमी निमित्त सप्ताहभर विनम्र अभिवादन !!

# वाणिज्य विभागाद्वारे 'मुलाखतीसाठी सामोरे कसे जावे आणि बायोडाटा तयार करणे' या विषयावर कार्यशाळा संपन्न





**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दिनांक ४ एप्रिल २०२५ रोजी वाणिज्य पदवी आणि पदव्युत्तर विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी ङ्ग मुलाखतीला कसे सामोरे जावे आणि बायोडाटा तयार करणेङ्ग या शीर्षकांतर्गत कार्यशाळा डॉ. प्रदीप गिऱ्हे, एमबीए विभागप्रमुख,देवगिरी महाविद्यालय आणि डॉ. श्रीकांत थोरात, संचालक, कृष्णा नोबेल फाउंडेशन, छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाने कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफ ेसर अशोक तेजनकर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गणेश मोहिते उपस्थित होते.

सदरील कार्यक्रमाचे प्रस्ताविक विभाग प्रमुख डॉ. राजेश लहाने यांनी केले. आपल्या प्रास्ताविकामध्ये त्यांनी पदवी व पदव्युत्तर वर्गात शिकत असलेल्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी सदरील कार्यक्रम अत्यंत उपयुक्त असून महाविद्यालय नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा प्रकारच्या विविध कार्यक्रमाचे आयोजन सातत्याने करत असते.

प्रमुख वक्ते प्रदीप गिऱ्हे यांनी बायोडाटा तयार करणे या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बायोडाटा तयार करताना व मुलाखतीला जाण्यापूर्वी काय काळजी घ्यावी व कशी तयारी करायची यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. बायोडाटा मध्ये नाव, शिक्षण, ईमेल, अद्ययावत लिंकडेन प्रोफाइल, प्राप्त केलेली कौशल्य, हॉबीज, इंटरटर्नशिप, कामाचा अनुभव इत्यादी बाबी विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

डॉ. श्रीकांत थोरात यांनी मुलाखतीला कसे सामोरे जावे या विषयावर मार्गदर्शन करताना आत्मविश्वासाने मुलाखतीला सामोरे जाण्यासाठी, कंपनी आणि भूमिकेचा सराव करून, तुमच्या उत्तरांचा सराव करून आणि सकारात्मक देहबोली आणि संवादावर लक्ष केंद्रित करून कसून तयारी करा. मजबूत छाप पाडण्यासाठी आणि पदासाठी तुमची योग्यता दाखवण्यासाठी आत्मविश्वास महत्त्वाचा आहे. आत्मविश्वासाने मुलाखत कशी द्यावी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. मुलाखतीला आत्मविश्वासाने कसे सामोरे जायचे याचे - कंपनी आणि भूमिकेचा अभ्यास करा, तुमच्या उत्तरांचा सराव करा, विचारण्यासाठी प्रश्न तयार करा, तुमची ताकद आणि कमकुवतपणा जाणून घ्या, योग्य पोशाख घाला, चांगली मुद्रा आणि डोळ्यांचा संपर्क ठेवा, हसणे आणि संपर्क साधण्यास सक्षम व्हा, स्पष्टपणे बोला आणि तुमचे विचार व्यक्त करा, प्रामाणिक रहा. तुमच्या ताकदी आणि अनुभवांवर लक्ष केंद्रित करा, यशाची कल्पना करा, तुमचा वेळ घ्या, काळजीपूर्वक ऐका, स्पष्टीकरणासाठी विचारा, सकारात्मक आणि उत्साही रहा, मुलाखतकाराचे आभार माना, उपप्राचार्य डॉ. गणेश मोहिते यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना असे म्हणाले की विद्यार्थ्यांनी नोकरी मिळवण्यासाठी मुलाखत तंत्रासी अवगत असणे आवश्यक आहे. मुलाखत कर्त्याकडे असलेल्या ज्ञानाची योग्य मांडणी करण्याची कला प्राप्त करण्यासाठी मुलाखतीविषयी मुलाखती दरम्यान कोणती काळजी घ्यावी याबाबत योग्य मार्गदर्शन मिळाल्यास भविष्यात त्याचा विद्यार्थ्यांना निश्चितच फायदा होईल. अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर यांनी मुलाखत हा नोकरी मिळवण्याचा महत्त्वाचा टप्पा आहे. मुलाखत देणाऱ्या व्यक्तीकडे ज्या पदासाठी त्यांनी अर्ज केला आहे त्या पदाविषयी आवश्यक असलेले ज्ञान, कौशल्य,तसेच त्या पदाची जबाबदारी इत्यादीविषयी त्या विद्यार्थ्याला सविस्तर माहिती असणे आवश्यक आहे. विद्यार्थी मुलाखतीसाठी योग्य तयारी करून गेल्यास त्याला निश्चितपणे यश प्राप्त होते.

सदरील कार्यक्रमासाठी वाणिज्य विभागातील पदवी आणि पदव्युत्तर अंतिम वर्षाचे २६० विद्यार्थी उपस्थित होते. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजेश लहाने यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. स्नेहा अशोक यांनी केले.

# व्यवस्था सर्वोत्तम होणे शक्य

**भारतीय वैद्यकीय व्यवस्था अजून उत्क्रांत होत असून, ती आणखी चांगली करता येईल. कमी खर्च, त्रिस्तरीय संस्थात्मक रचना, देशातच तयार झालेले वैद्यकीय-परावैद्यकीय मोठे मनुष्यबळ, स्वस्त व देशांतर्गत उत्पादित औषध व सामग्री पुरवठा, योग-आयुर्वेदादी पर्यायी उपचारपद्धती, खासगी-सरकारी-धर्मादाय अशी रचना, अर्ध बंदिस्त नियंत्रण/नियमन ही आपल्या व्यवस्थेची काही वैशिष्ट्ये आहेत.**




**गेल्या** दशकात भारतीय वैद्यक व्यवस्था कात टाकत आहे. ती सर्वोत्तम नसेल; पण देशोदेशीच्या 'आदर्श' व्यवस्था प्रत्यक्ष पाहिल्यावर आपण तुलनेने आणि काही बाबतीत बरे आहोत, असे माझे प्रतिपादन आहे. कोणतीही वैद्यकीय व्यवस्था बरी-वाईट ठरवण्याचे सामान्यपणे निकष धरून ०-५ स्केलवर काही नमुनेदार देशांचे/प्रारूपांचे व आपले एक तौलनिक आकलन मी मांडतो आहे. याचबरोबर जागतिक क्रमवारी ठरवणारे विविध हेल्थ केअर इंडेक्स आहेत, त्यापैकी दोन इथे दिले आहेत (निरनिराळ्या पद्धती आणि निकषानुसार क्रमवारी बदलते).

आरोग्यव्यवस्थेचे विकसन राजकीय-सामाजिक-आर्थिक अशा दीर्घ व वयामिश्र प्रक्रियेतून होते, त्यामुळे ते बदलणे सोपे नसते. उदाहरणार्थ ब्रिटिश आणि अमेरिकन नागरिकांची प्रचंड तक्रार असूनही तिथल्या वैद्यकीय व्यवस्था सुधारणे दुष्कर झाले आहे.

(ऑक्सफर्ड, हार्वर्ड आदी विद्यापीठे तिथली व्यवस्था सुधारू शकत नाहीत, आपण मात्र त्यांच्या पायावर मार्गदर्शनासाठी लोळण घेतो). त्यामानाने भारतीय व्यवस्था अजून उत्क्रांत होत असून, ती आणखी चांगली करता येईल. कमी खर्च, त्रिस्तरीय संस्थात्मक रचना, देशातच तयार झालेले वैद्यकीय-परावैद्यकीय मोठे मनुष्यबळ, स्वस्त व देशांतर्गत उत्पादित औषध व सामग्री पुरवठा, योग-आयुर्वेदादी पर्यायी उपचारपद्धती, खासगी-सरकारी-धर्मादाय अशी त्रिवेणी/त्रिपेडी रचना, अर्ध बंदिस्त नियंत्रण/नियमन ही आपल्या व्यवस्थेची काही वैशिष्ट्ये आहेत. गेल्या काही वर्षात (२००५ पासून) नॅशनल हेल्थ मिशनमार्फत वैद्यक-संरचना सुधारण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मातामृत्यू-बालमृत्यू, क्षयरोग, मलेरिया, कालाआजार आदी लक्षणीय प्रमाणात कमी झाले आहेत. सरकारी रुग्णालये सुधारत आहेत. अधिक वैद्यकीय महाविद्यालये सुरू होत आहेत. प्रधानमंत्री जनआरोग्य योजना (प्रजआयो) हे एक मोठे परिवर्तन आहे. यातून गरीब कुटुंबाना रुग्णालयात सेवा मोफ्फत मिळत आहेत. खासगी वैद्यकीय सेवाही यात सामील केल्या आहेत. स्वच्छ भारत, नल जल योजना, उज्ज्वला योजना, स्वास्थ्य-संवर्धन (वेलनेस) केंद्रे आदी जीवनस्तरविषयक सुधारणा सुरू आहेत. आरोग्यव्यवस्थेत डिजिटल माहिती-प्रणाली स्थिरपद होत आहेत.

**चांगली आरोग्यसेवा म्हणजे नेमके काय?**

एक अभ्यासक आणि नागरिक म्हणून 'चांगल्या' आरोग्य-वैद्यकीय सेवेकडून माझ्या/आपल्या काही निश्चित अपेक्षा असतात. (अ) मला माझ्या निकटच्या परिसरात चांगली प्राथमिक आरोग्यसेवा, सत्वर आणि कमी खर्चात मिळावी आणि आवश्यक तेव्हा योग्य तज्ञ/रुग्णालयात तत्पर पाठवणीची सोय असावी. (ब) आजारांची/आरोग्यसमस्यांची आणि उपलब्ध सेवा-सुविधांची प्रांतिक भाषेत मोबाइलवर सहजपणे अधिकृत माहिती मिळावी. (क) उच्चस्तरीय तज्ञसेवा आणि रुग्णालयसेवा सहजपणे कमी खर्चात, पारदर्शकपणे निवडता याव्यात. त्यासाठी जीवनदायी योजना किंवा तत्सम विमा-संरक्षण उपलब्ध असावे (ड ) वैद्यकीय सेवांची गुणवत्ता आणि परिणाम उत्तम असावेत. (इ) विविध तपासण्या आणि औषधोपचार रास्त खर्चात/विमा संरक्षणातून मिळाव्यात. (ई) विविध सेवा निवडण्याचे स्वातंत्र्य असावे.

**आरोग्य व्यवस्थेसमोरची मोठी आव्हाने**

यात लहान-मोठी आव्हाने आहेत. पैकी पाच महत्वाचे मुद्दे आणि तत्संबंधी उपाय मी इथे संक्षेपात मांडतोय. (अ) आपण सर्व आरोग्यव्यवस्था 'डॉक्टरकेंद्री' बनवण्याचा अट्टहास करीत आहोत. दर एक हजार लोकांमागे एक डॉक्टर हे प्रमाण आपण स्वीकारून फक्त वैद्यकीय महाविद्यालये आणि सीट्स वाढवत गेलो आहोत. काही प्रांत सोडता पश्चिम-दक्षिण भारत, पंजाब, बंगाल, दिल्ली इत्यादि भागात १०००:१ हेही प्रमाण कधीच ओलंडले आहे. अशी 'डॉक्टरकेंद्री' व्यवस्था महाग, समस्याग्रस्त आणि शहरकेंद्री होत जाते. प्राथमिक पातळीवर परिचारिका, परावैद्यकीय सेवक, आशा आदी मंडळी योग्य पूरक सेवा देऊ शकतात. (२) भारतात आयुर्वेद, होमिओपॅथी आदी पर्यायी उपचारपद्धती आहेत, त्यांचा समावेश राष्ट्रीय आरोग्य व्यवस्थेत थेट झाला तर वैद्यकसेवेची आंतरिक गुणवत्ता वाढेल, पर्यायी मनुष्यबळ मिळेल आणि लोकांना एक निवडीचा पर्याय मिळेल; तसेच उपचारावरचा खर्च कमी होईल. आयुर्वेद आदी पदवीधर हिशेबात धरल्यास आजच ८६५:१ डॉक्टर हे प्रमाण आपण गाठले आहे.

अर्थात चांगले पुन:प्रशिक्षण आणि परीक्षा ही यासाठी पूर्व-अट असायला हवी. मोदी सरकारने याबाबतीत केलेल्या प्रयत्नांना काही संघटनांनी अकारण विरोध केला. (३) आरोग्यसेवेवर सरकारी खर्च सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या एक टक्क्यांच्या आसपास म्हणजे कमी असला तरी, याशिवाय तीन टक्के खासगी खर्चदेखील होतोय, तो अधिक सत्कारणी लागणे महत्वाचे आहे.

मध्यमवर्गाला प्रीपेड 'प्रजआयो' उपलब्ध करून त्यात योग्य वर्गणीसह सामील करावे. यातून 'प्रजआयो' निधी आणि व्याप्ती वाढेल आणि रुग्णालय सेवेवरचा खासगी खर्च अधिक काटेकोरपणे वापरला जाईल.

अर्थात 'प्रजआयो'मध्ये देखील सुधारणा आवश्यक आहेत. 'प्रजआयो' मुख्य म्हणजे दर-नियंत्रण मानणाऱ्या आणि धर्मादाय रुग्णालयासाठी (बरीच खासगी वैद्यकीय महाविद्यालय-रुग्णालये वस्तुत: धर्मादाय आहेत) सीमित करावी. प्रीपेड 'प्रजआयो' सेवांसाठी सर्व सरकारी /महापालिका व सार्वजनिक रुग्णालयात सेवाकक्ष असावेत.

(४) वैद्यकीय माहितीचा अभाव असल्याने फ्फसवणूक टाळण्यासाठी विविध भाषांमध्ये प्राथमिक आरोग्याचे मार्गदर्शन सहजपणे उपलब्ध करणे आवश्यक आहे. (५) भारतात वैद्यकीय सेवा गुणवत्ता नियंत्रणाची समस्या आहे, यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान वापरून वैद्यकीय सेवाचे मूल्य आणि गुणवत्तावर्धन प्रणाली निर्माण करावी. या पाच उपायांनी भारतीय आरोग्यसेवा जगात सर्वोत्तम होऊ शकते.

**-डॉ. श्याम अष्टेकर**
(लेखक एका वैद्यकीय महाविद्यालयात सार्वजनिक आरोग्य शास्त्राचे प्राध्यापक आहेत,)


# भ.महावीर जन्मकल्याणक महिला समितीचा खंडेलवाल नव युवती- चंद्रप्रभू महिला मंडळाच्या पान पाककला व्यंजनांनी आणली स्वादिष्ट चव





**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भ.महावीर जन्मकल्याणक महिला समिती अंतर्गत नवयुवती मंडळ,चंद्रप्रभू महिला मंडळातर्फे मंगळवारी आयोजित नागेली (खाण्याचे) पानापासून केलेल्या पाककला स्पर्धेत स्वादिष्ट व्यंजने तयार करत आपल्या पाक कलेचे कौशल्य दाखवले.८० स्पर्धकांनी भाग घेतला.



चंद्रप्रभू खंडेलवाल मंदिर हडको येथील उद्घाटन प्रसंगी स.सो. खंडाळकर कैलास कासलीवाल, अशोक अजमेरा मुकेश गंगवाल, स्वप्नील पारख, भारती बागरेच्या संगीता संचेती सारिका साहूजी, सविता लोढा, मनीषा भन्साळी, ललिता साकला, तनुजा गांधी तसेच प्रतीक साहूजी, निलेश जैन, बाहुबली वायकोस, प्रमोद पाटणी, पंकज साखला, भावना सेठीया, करूणा साहुजी, मंगल पारख,कवीता अजमेरा आदींच्या उपस्थितीत उद्घाटन झाले.

कलाकंद, पकोडे, आईस्क्रीम, तांबूल, केक,अप्पे, नारळ पान गुलकंद लाडू, चॉकलेट लाडू, गुलकंद,पान शॉर्ट, खोबरा रोल, पानवडी, विविध प्रकारची शरबते, बर्फी,थंडाई, मिल्क शेक, मसाला, बिस्कीट रेल्वेवरील पान बर्फी, पानरोल, नॅचरल मसाला पॅटीस, डबल डेकर, मिठाई, आदी विविध पदार्थ बनवून आकर्षक सजावटीद्वारे मांडणी केली होती.

सूत्रसंचालन राहुल कासलीवाल यांनी केले स्पर्धा संयोजक मंडळाच्या अध्यक्षा सोनल बडजाते, प्रतीक्षा पापडीवाल, मानसी चांदीवाल, संजना चांदिवाल, सायली बडजाते, विभा कासलीवाल तसेच रिधिमा बाकलीवाल, श्रुती लोहाडे, संजना पाटणी, दीक्षा पांडे भूमी चुडीवाल आदींनी परिश्रम घेतले. परीक्षक म्हणून समय चुडीवाल, रूपाली भाटिया यांनी काम पाहिले.

याप्रसंगी मंजू पाटणी, मीना पापडीवाल, आशा कासलीवाल, निलेश जैन, डॉ. शैलेश चांदीवाल, संजय पाटणी, विनोद सेठी, बबलू कासलीवाल, दिलीप पांडे, पंकज काला, राजकुमार बडजाते, रौनक कासलीवाल आदीसह समाज बांधवांची उपस्थिती होती अशी माहिती प्रशांत शहा नरेंद्र अजमेरा नरेंद्र अजमेरा यांनी दिली.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी आधार आणि कागदपत्र पडताळणीचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

कौशल्यविकास, रोजगार व उद्योजकता आणि नावीन्यता विभागाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या प्रशिक्षणार्थींसाठी आधार आणि आवश्यक कागदपत्र पडताळणी ३० एप्रिल २०२५ पर्यंत करण्याचे आवाहन केले आहे.

या योजनेअंतर्गत, प्रशिक्षणार्थींना ११ महिन्यांसाठी प्रशिक्षण दिले जाईल .आणि त्यांच्या बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरित केले जातील.१० मार्च २०२५ पूर्वी सहा महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना उर्वरित पाच महिन्यांसाठी प्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध आहे. तसेच, नवीन उमेदवारांनाही या योजनेचा लाभ घेता येईल.

प्रशिक्षणार्थींनी त्यांच्या आधार आणि आवश्यक कागदपत्रांची उदा. आधार, शैक्षणिक पात्रता, वय, अधिवास प्रमाणपत्र पडताळणी करणे आवश्यक आहे. तसेच, त्यांनी htts://www. cmyky.mahaswayam .gov.in या संकेतस्थळावरील प्रतिज्ञापत्राचा नमुना संबंधित सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्याकडे सादर करणे अनिवार्य आहे.

आधार सीडेड डीबीटी सक्षम करण्यासाठी, सर्व प्रशिक्षणार्थींनी त्यांचे बँक खाते आधार सीडिंग करणे आवश्यक आहे.

या योजनेअंतर्गत प्रशिक्षणार्थी घेण्यास इच्छुक असलेल्या संस्थांनी देखील कागदपत्र पडताळणी पूर्ण करणे आवश्यक आहे. १० मार्च २०२५ च्या शासन निर्णयानुसार, आधार आणि कागदपत्र पडताळणी पूर्ण झाल्याशिवाय कोणत्याही प्रशिक्षणार्थीला प्रशिक्षणासाठी रुजू करून घेतले जाणार नाही.

प्रत्येक प्रशिक्षणार्थीची नोंदणी आधार पडताळणी (आधार व्हेरिफाय) अनिवार्य आहे. डीबीटी लाभासाठी आधार लिंक केलेले बँक खाते क्रमांक देणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थींनी त्यांचे आधार कार्ड आणि आवश्यक कागदपत्रे संबंधित सहायक आयुक्त कार्यालयात सादर करावीत. कार्यालयातील अधिकारी कागदपत्रांची पडताळणी करतील आणि आधार व्हेरिफिकेशन पूर्ण करतील.अधिक माहितीसाठी, प्रशिक्षणार्थींनी त्यांच्या जिल्ह्याच्या कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्राशी संपर्क साधावा. आधार आणि कागदपत्र पडताळणी अंतिम तारीख ३० एप्रिल २०२५ पर्यंत करावी. जिल्ह्याचे कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्र. छत्रपती संभाजी नगर या कार्यालयातील श्री प्रवीणकुमार बागले ,संपर्क क्रमांक ९४ २१ ६८ ७० ९४ व प्रीतम सोनवणे यांचा संपर्क क्रमांक ७२ १८ ३९ ९४ ०० यांना कार्यालयीन वेळेत फोनद्वारे किंवा प्रत्यक्ष संपर्क साधावा असे आवाहन सहाय्यक आयुक्त. जिल्हा कौशल्य विकास ,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# खरा अन्यायपीडित कोण? प्रा. शंकर अंभोरे की प्रा. प्रज्ञा काळे?

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

न्यायालयाच्या आदेशापेक्षाही शंकर अंभोरे मोठे आहेत का? न्यायालये संविधानानुसार चालतात आणि आपण सगळे संविधानाचा सन्मान करणारे आहोत. मग शंकर अंभोरे माझ्यावर अन्याय झाला, अन्याय झाला म्हणून जी बोंब ठोकत आहेत, त्यात कितपत तथ्य आहे? हा मात्र संशोधनाचा वेगळा विषय आहे. आता शंकर अंभोरे समाजाची दिशाभूल करत आहेत. आपलीच माणसे टार्गेट करत आहेत. सोशल मीडियावर याची पोल खोलतो, त्याची पोल खोलतो, असे ओरडत आहेत, खरी पोलखोल त्यांचीच झाली आहे कारण प्रज्ञा काळे याही मागासवर्गीयच आहेत. प्रा. डॉ. शंकर अंभोरे ज्या कॉलेजचे प्राचार्य आहेत त्या कॉलेजनी व तेथील संस्थाचालकांनी घोटाळ्याचा कळस गाठला आहे संस्थाचालकांवर अध्यक्ष सचिव यांना अटक झालेली असून सगळ्यांच्या डिग्र्या बोगस आहेत यापुढे जाऊन विद्यापीठाने तेथील सर्व प्राध्यापकाच्या व कर्मचाऱ्यांचे रेकॉर्ड तपासून कॉलेजवर प्रशासक नेमावा ही परिस्थिती त्या कॉलेजची आहे शेवटी विद्यापीठ योग्य न्याय दिलच ही अपेक्षा आहेच. नसता आमच्या पक्षातर्फे या विरोधात आम्ही लढा लढणार असून वेळप्रसंगी रस्त्यावरही उतरणार? असे महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल वडमारे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले

खुलताबाद येथील कोहिनूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर अंभोरे यांची प्राचार्यपदाची मान्यता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने रद्द केल्यामुळे डॉ. शंकर अंभोरे हे माझ्यावर अन्याय झाला, मला न्याय द्या अशी ओरड करत आहेत. परंतु खरंच प्रा. डॉ. शंकर अंभोरेवर अन्याय झाला की त्यांनीच कोणावर तरी अन्याय केल्यामुळे विद्यापीठाने त्यांची प्राचार्यपदाची मान्यता रद्द केली?

प्रा. प्रज्ञा काळे या कोहिनूर महाविद्यालयात मानसशास्त्राच्या प्राध्यापक म्हणून २७ एप्रिल २००९ रोजी रुजू झाल्या. २८ एप्रिल २०११ रोजी त्यांची सेवा कायम करण्यात आली. नंतरच्या काळात संस्थेचे विद्यमान अध्यक्ष डॉ. मझहर खान आणि कोहिनूर महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाकडून आपला छळ केला जात असल्याची तक्रार प्रा. प्रज्ञा काळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू व उच्च शिक्षण सहसंचालकांकडे केली.

विद्यापीठाने प्रा. प्रज्ञा काळे यांची तक्रार कोहिनूर महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे वर्ग करत चौकशी करून अहवाल देण्याचे निर्देश दिले. त्यावर कोहिनूर महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने सत्यशोधन समिती नेमली. या सत्यशोधन समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. शंकर अंभोरे होते. कोहिनूर महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाकडून छळ केला जात आहे, या प्रज्ञा काळे यांच्या तक्रारीत तथ्य आहे की नाही, याचेच सत्यशोधन प्रा. डॉ. शंकर अंभोरे यांच्या सत्यशोधन समितीला करायचे होते. पण शंकर अंभोरे समितीने मूळ सत्यशोधन न करता थेट प्रा. प्रज्ञा काळे यांना सेवेतून बडतर्फ करण्याची शिफारस आपल्या अहवालात केली आणि त्यांच्याच अहवालावरून कोहिनूर महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने ४ नोव्हेंबर २०१६ रोजी प्रा. प्रज्ञा काळे यांना सेवेतून बडतर्फ केले. हा शंकर अंभोरे यांनी प्रा. प्रज्ञा काळे यांच्यावर केलेला पहिला अन्याय. होय

प्रा. प्रज्ञा काळे यांनी या बडतर्फीला विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधीकरणात आव्हान दिले. न्यायाधिकरणाने प्रा. प्रज्ञा काळे यांच्या बाजूने निकाल दिला आणि त्यांना पुन्हा रूजू करून घेऊन वेतन थकबाकी देण्याचा आदेश १८ एप्रिल २०१८ रोजी दिला. न्यायाधीकरणाच्या या निर्णयाला कोहिनूरच्या व्यवस्थापनाने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात आव्हान दिले. पण खंडपीठाने १ डिसेंबर २०२३ रोजी न्यायाधिकरणाचा निर्णय कायम ठेवला. खंडपीठाच्या निर्णयाविरुद्ध कोहिनूरचे व्यवस्थापन सर्वोच्च न्यायालयात गेले. पण सर्वोच्च न्यायालयानेही ३० जून २०२४ रोजी खंडपीठाचा निर्णय कायम ठेवला.

दरम्यानच्या काळात मे २०२३ मध्ये हेच शंकर अंभोरे कोहिनूर महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून रूजू झाले.

न्यायाधिकरण, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असूनही त्यांनी प्रा. प्रज्ञा काळे यांना महाविद्यालयात रूजू करून घेतले नाही, घेऊ दिले नाही. उलट मानसशास्त्राचा वर्कलोड नाही, त्यामुळे मानसशास्त्राच्या सहायक प्राध्यापकाचे पदच अतिरिक्त ठरल्यामुळे प्रा. प्रज्ञा काळे यांना रूजू करून घेता येणार नाही, असे दाखवण्यासाठी त्यांनी उच्च शिक्षण सहसंचालकांकडून अनुदान निर्धारणाच्या नावाखाली प्रा. प्रज्ञा काळेंचे पद अतिरिक्त ठरवण्याचा खटाटोप केला.

न्यायालयाचे आदेश असूनही आपणाला रूजू करून घेतले जात नाही म्हणून प्रा. प्रज्ञा काळे यांनी खंडपीठात अवमान याचिका दाखल केली. त्यांच्या अवमान याचिकेवर खंडपीठाने नोटिसा बजावल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने प्राचार्य शंकर अंभोरे यांना न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे प्रा. प्रज्ञा काळे यांना रूजू करून का घेतले नाही? अशी नोटीस बजावली. तरीही शंकर अंभोरे यांनी प्रा. प्रज्ञा काळे यांना रूजू करून घेतले नाही. डॉक्टर शंकर आंबोरे यांनी साळवे यांना रुजू करून घ्यायला पाहिजे होते पण त्यांनी तसे केले नाही

नोटीस बजावूनही प्राचार्य शंकर अंभोरे यांनी प्रा. प्रज्ञा काळे यांना कोहिनूर महाविद्यालयात रूजू करून घेतले नसल्यामुळे विद्यापीठाने न्यायालयीन आदेशाचा सन्मान राखण्यासाठी १५ मार्च २०२५ रोजी शंकर अंभोरे यांची प्राचार्यपदाची मान्यता रद्द केली.

# भगवान महावीर जन्म कल्यानक नमो परिवारच्या वतिने सुरेश भाई जैन याच्या भक्ती गिताचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भगवान महावीर जन्म कल्याण महोत्सव १० एप्रिल रोजी छत्रपती संभाजीनगरात उत्सवात साजरा करण्यात येणार असून दिनांक. ०६ एप्रिल रोजी संध्याकाळी ०६ वाजता तापडिया कासलीवाल ग्राउंड येथे होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजक नमो परिवार व संयोजक १०८ गौ सेवा ग्रुप व सकल जैन समाज यांच्या सयुक्त विद्यमाने चैनई येथील सुरेश भाई जैन व मुंबई येथील भाविक शाहा हे शासन स्पर्श व भगवान महावीर याचा जीवनावनर उदबोधन आयोजन व धार्मिक भक्तिगीत सादर करणार आहेत. यामध्ये भगवान महाविरावर व जैन धर्मावर धार्मिक गित प्रस्तुत करणार आहेत. तरी समाज बांधवानी वरिल कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान आयोजक नमो परिवार व संयोजक १०८ गौ सेवा ग्रुप व भगवान महावीर जन्म कल्याण समितीने केले आहे.



# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात जिल्ह्याची उल्लेखनीय कामगिरी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

**एक हजार पंधरा तरुणांनी उभारले स्वतःचे उद्योग**

जिल्ह्यातील १ हजार १५ तरुणांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (उचएऋझ) अंतर्गत स्वतःचे उद्योग उभारून नवा आदर्श निर्माण केला आहे. या योजनेतून मिळालेल्या मदतीचा योग्य उपयोग करत त्यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू केला आहे .जिल्ह्याने २०२४-२५ या आर्थिक वर्षात १०३.३६ टक्के उद्दिष्ट पूर्ण केल्याची माहिती जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक स्वप्नील राठोड यांनी दिली.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेद्वारे उत्पादन क्षेत्रातील उद्योजकाला ५० लाख रुपये, तर सेवा क्षेत्रातील उद्योजकाला २० लाखांपर्यंत कर्ज दिले जाते. सर्वसाधारण प्रवर्गातील उद्योजकाला कर्ज रकमेच्या १५ ते २५ टक्के, तर विशेष प्रवर्ग, एससी, एसटी, महिला, अपंग, माजी सैनिक, ओबीसी व अल्पसंख्यांकांना २५ ते ३५ टक्के अनुदान दिले जाते. जिल्हा उद्योग केंद्राकडे अर्ज सादर केल्यानंतर मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कार्यबल समिती मार्फत कर्ज प्रस्ताव बँकेकडे शिफारस केला जातो.

बँकेने मंजूर व वाटप केल्यानंतर उद्योग-व्यवसाय उभारण्यासाठी अनुदान दिले जाते.

कर्ज प्रस्ताव योजनेत राष्ट्रीयकृत बँकाचा सहभागानुसार राष्ट्रीयीकृत सीएमईजीपीमध्ये बँकांच्या शाखा २१८, जिल्ह्यात मंजूर केली आहेत ५८८, सीएमईजीपीत खासगी बँकांच्या शाखा ७९ जिल्ह्यात मंजूर केली आहेत .यात २४७ कर्जाची प्रकरणे करण्यात आली.

जिल्ह्यातील तालुकानिहाय लाभार्थी संख्या व उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.छत्रपती संभाजीनगर उद्दिष्ट ५७४ लाभार्थी संख्या ५९९, ता.गंगापूर उद्दिष्ट ९८ लाभार्थी संख्या ९५, ता. वैजापूर उद्दिष्ट ४८ लाभार्थी संख्या ६२, ता. खुलताबाद उद्दिष्ट २८ लाभार्थी संख्या -२६, ता.कन्नड उद्दिष्ट ५१ लाभार्थी संख्या ४७, ता.सिल्लोड उद्दिष्ट ५४ लाभार्थी संख्या ६४, ता.सोयगाव उद्दिष्ट २२ लाभार्थी संख्या १६,ता.फुलंब्री उदिष्ट ३६, लाभार्थी संख्या ३७, ता.पैठण उदिष्ट ७१ , लाभार्थी संख्या ६९ जिल्ह्यातील एकूण उद्दिष्टे ९८२ लाभार्थी संख्या १०१५ जिल्ह्यातील टक्केवारी १०३.३६ आहे.

# भगवान महावीर जन्म कल्याण महोत्सव महिला समिती अंतर्गत साधना भवन महिला मंडळाच्या धार्मिक- सामान्यज्ञान प्रश्न मंच स्पर्धेला महिलांचा प्रतिसाद

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भगवान महावीर जन्म कल्याण महोत्सव महिला समिती अंतर्गत श्री महावीर स्थानक वासी जैन श्रावक संघ साधना भवन हडको महिला मंडळातर्फे धार्मिक व सामान्य ज्ञान प्रश्न मंच स्पर्धा मंगळवारी झाली. यास महिलांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.

चंद्रप्रभू खंडेलवाल जैन मंदिर हडको येथे झालेल्या स्पर्धेत १२० स्पर्धक महिलांनी भाग घेतला अध्यक्ष विजय देसर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली राखी बोरा शितल कटारिया सीमा पारक शिल्पा संचेती रश्मी बोथरा योगिता चोरडिया यांनी अभ्यासू धार्मिक व सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्न विचारले होते.

स्पर्धेचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार स.सो.



खंडाळकर स्वप्निल पारख भारती बागरेच्या कैलास कासलीवाल, निलेश जैन बाहुबली बायकोस, मुकेश गंगवाल मुकेश साहूजी प्रतीक साहूजी, प्रमोद पाटणी, राहुल कासलीवाल, मनीषा भन्साळी सविता लोढा भावना सेठिया, करुणा साहूजी, अशोक अजमेरा डॉक्टर शैलेश चांदीवाल मंगल पारख, संगीता संचेती, सारिका साहूजी, तनुजा गांधी, कला आचलिया प्रमोद पाटणी, मीना पापडीवाल मंजू पाटणी आशा कासलीवाल, आदींच्या उपस्थितीत अशी माहिती प्रशांत शहा नरेंद्र अजमेरा यांनी दिली

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**